अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत.
सन २०१७-१८ करिता निधी वाटप.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः वसगृ - २०१७/प्र.क्र.४८/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०१७.

वाचा -

१) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२००९/प्र.क्र.१५/का.८, दि.०२ मार्च, २०१०,
२) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८, दि.२० डिसें., २०११,
३) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. वसगृ-२०१६/प्र.क्र.३१/का.८, दि.३० मार्च, २०१६,
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७,
५) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. अविवि-२०१७/प्र.क्र.३१/का.७, दि.१९ एप्रिल, २०१७,
६) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. वसगृ-२०१७/प्र.क्र.४८/का.८, दि.२१ जून, २०१७,
७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७,
८) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. वसगृ-२०१७/प्र.क्र.४८/का.८, दि.२५ सप्टेंबर, २०१७,
९) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र.साशा/कार्या-१०/स्थानि-२/२०१७/५१२, दि.१३ सप्टेंबर, २०१७.

प्रस्तावना -

राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतीगृहे बांधण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २ मार्च, २०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीवर अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह बांधण्यासंदर्भातील कार्यपध्दती दि.२० डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. तसेच अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता बांधण्यात येत असलेल्या वसतीगृहांच्या व्यवस्थापनाबाबत कार्यपध्दती दिनांक २१ जून, २०१३ व दि.२८ जुलै, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतीगृह बांधकाम करण्याकरिता सन २०१७-१८ करिता "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरातील अल्पसंख्यांक समाजातील वसतीगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५ ए १४२), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली रु.१४.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ व ५ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्रथम नऊ माहीकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या ८०% च्या मर्यादेत म्हणजेच रू.११.२० कोटी निधी उपलब्ध करण्यात आला. त्यापैकी संदर्भ क्र.६ च्या शासन निर्णयान्वये रू.६,०२,७०,०००/-(अक्षरी रू.सहा कोटी दोन लाख सत्तर हजार फक्त) मंजूर निधी वितरीत करण्यात आला

आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.७ येथील परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या वर्षाकरिता महसूली लेख्यांतील निधी वितरणाची मर्यादा ७०% इतकी करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ करिता बी.डी.एस. प्रणालीवर रू.९,८०,००,०००/- (अक्षरी रू.नऊ कोटी ऐंशी लाख फक्त) निधी उपलब्ध आहे. तसेच संदर्भ क्र.८ च्या शासन निर्णयान्वये रू.१,००,००,०००/-(अक्षरी रू.एक कोटी फक्त) मंजूर निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे संदर्भ क्र.६ व ८ च्या शासन निर्णयान्वये वितरित रू.७,०२,७०,०००/-(अक्षरी रू.सात कोटी दोन लाख सत्तर हजार फक्त) वजा करता रू.२,७७,३०,०००/-(अक्षरी रू.दोन कोटी सत्याहत्तर लाख तीस हजार फक्त) निधी शिल्लक आहे. संदर्भ क्र.९ च्या पत्रान्वये माहे सन २०१७-१८ करिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी वसतिगृह व्यवस्थापनासाठी उर्वरित निधी वितरीत करण्याची मागणी केलेली असुन निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय -</u>

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना वित्त विभागाच्या संदर्भ क्र.७ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० % मर्यादेत बी.डी.एस.प्रणालीवर शिल्लक रू.२,७७,३०,०००/-(अक्षरी रू.दोन कोटी सत्याहत्तर लाख तीस हजार फक्त) निधीपैकी रु.१३,००,०००/- (अक्षरी रू.तेरा लक्ष फक्त) निधी खालीलप्रमाणे वितरीत करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	वसतीगृहाचे ठिकाण	वितरीत करावयाची तरतूद
१	शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर	रु.१३,००,०००/-
	एकूण	**रु.१३,००,०००/-**

२. वरीलप्रमाणे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर यांच्या आवारातील अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या वसतीगृहाच्या **<u>व्यवस्थापनासाठी</u>** रू.१३,००,०००/- (अक्षरी रु. तेरा लक्ष फक्त) इतकी रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून आहरण व संवितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर तरतूद जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे सूपुर्द करण्यात येत असून याकरीता जिल्हाधिकारी, चंद्रपूर "नियंत्रक अधिकारी" आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून काम पाहतील.

४. सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावे तसेच अतिप्रदान व अखर्चित निधी परतावा शासनास भरणा (जमा) करण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या परिपत्रकातील सूचनानुसार संबधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. उपरोक्त निधीचा माहे डिसेंबर, २०१७ पूर्वी आढावा घेऊन निधी अखर्चित रहात असेल वा समर्पित करावयाचा असेल तर तो B.D.S. प्रणालीवर माहे, डिसेंबर, २०१७ अखेर पर्यंत समर्पित करण्यात यावा. निधी योग्यवेळी समर्पित न केल्याने निधी वाया गेल्यास/ उपयोगात न आल्यास त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची राहील.

५. सदरचा खर्च करताना वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C. च्या मार्गदर्शक तत्वांचा/ CAG च्या निदेशानुसार कोणताही शासन निर्णय/अटी व शर्तीचा भंग होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरित करण्यापूर्वी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरिक्षण अहवाल/वित्तीय कार्यपध्दती यांचा

अवलंब करावा. सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

६. सदरचा खर्च मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरातील अल्पसंख्यांक समाजातील वसतीगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५ ए १४२), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ येथील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील अ.क्र. ३ व ९ मधील अटींची तसेच वित्त विभागाच्या दि.३० जून, २०१७ च्या परिपत्रकातील अटींची पुर्तता होत असून प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. "

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१७१०१३१५०५१३०२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba9951375d8539e02179fc093b36c7c7d7a866fc20f129ea0ff67bbde52fa539, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2017.10.13 14:54:09 +05'30'

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
५) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
६) संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
७) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मुंबई
८) अवर सचिव, का.७, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की त्यांनी उक्त रकमा संबंधिताना कृपया B.D.S. वर तात्काळ उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.
१०) वित्त विभाग (अर्थसंकल्प -१४, व्यय -४) मंत्रालय, मुंबई
११) नियोजन विभाग (कार्या.१४७५)
१२) निवड नस्ती, का.८.